दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०२०
निशाण क्रमांक ४४

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु.**

माझे नाव – प्रकाश गणपती सुतार,
वय – ४९ वर्षे, व्यवसाय – नोकरी (वन परीक्षेत्र अधिकारी तथा वृक्ष अधिकारी, रत्नागिरी), नेमणुक – रत्नागिरी, जि. रत्नागिरी.

**साक्षीदाराचा सरतपास, अर्जदारतर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांचेकडून –**

**०१.** वनपरीक्षेत्र अधिकारी तथा वृक्ष अधिकारी, रत्नागिरी म्हणुन चार तालुके माझ्या अधिपत्याखाली येतात. राजापुर, लांजा, संगमेश्वर व रत्नागिरी अशी सदरची चार तालुके आहेत. दिनांक ३० मे २०२२ पासुन सदर पदावर कार्यरत आहे. न्यायालयाच्या साक्षी समन्सनुसार आज रोजी न्यायालयात मी दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ०१/२०२० याकामी हजर झालो आहे.

**०२.** सदर प्रकरणात रामचंद्र सोमनाथ लाखण विरुध्द काशीनाथ गंगाराम लाखण असे पक्षकार समाविष्ठ आहेत. आमच्या कार्यालयामार्फत विनापरवाना आंब्यांची झाडे तोडल्याने संबंधीत इसम – काशीनाथ गंगाराम लाखण व इतर – ०३ यांना झाडे तोडण्याबाबत अधिनियम अंतर्गत रक्कम रुपये १,०००/– प्रत्येकी असा दंड करण्यात आला होता.

**०३.** सन २०२० – २०२१ साली सदर पदावर प्रियांका लगड या कार्यरत होत्या. त्यांची स्वाक्षरी मला दाखविल्यास मी ती ओळखु शकतो. दंड केलेबाबतचा आदेश दाखविल्यास मी तो ओळखु शकतो. *(साक्षीदारास निशाणी क्रमांक ३३ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत अनुक्रमांक ०१ कडील दस्त – रेंज विना परवाना झाड तोड रजिस्टर क्रमांक /९/२०२०–२०२१, रत्नागिरी दिनांक ०४/०६/२०२० रोजीचा आदेश दाखविण्यात आला).*

*(सदर दस्तातील मजकुर प्रस्तुत साक्षीदार हा सांगु शकणार नाही, असा*

*आक्षेप सामनेवालतर्फे विधीज्ञ यांनी घेतला. त्यावर प्रियांका लगड यांची स्वाक्षरी असल्याचे व सदरचा दस्त हा सार्वजनीक दस्तऐवज नसल्याचे त्यांनी म्हणणे सादर केले.*

*सदर आक्षेपावर अर्जदारातर्फे विधीज्ञ यांनी म्हणणे सादर केले की, सदर पदावर प्रियांका लगड या सन २०२० – २०२१ या सालामध्ये कार्यरत होत्या. त्याच पदावर आज रोजी प्रस्तुत साक्षीदार असुन त्यांच्या कार्यालयातील अभिलेखावरुन ते आज साक्ष देत आहेत. त्यामुळे, सदर दस्तामध्ये असलेल्या मजकुराविषयी सदर साक्षीदार कथन करु शकतो.*

*दोन्ही बाजुंना ऐकले. अभिलेख पाहिले. वर नमुद दंड करण्यात आल्याचा आदेश हा वनक्षेत्रपाल, रत्नागिरी यांच्या कार्यालयाचा शिक्का असलेला मुळ आदेश अभिलेखावर दाखल आहे. प्रस्तुत साक्षीदाराने त्याचे पुर्वाधिकारी – प्रियांका लगड यांची स्वाक्षरी ओळखु शकतो असे कथन केले आहे. सामनेवाला यांच्या तर्फे घेण्यात आलेलया आक्षेपानुसार सदरचा दस्त हा सार्वजनीक दस्तऐवज नसला तरीही, सदर साक्षीदार हा आदेशावरील स्वाक्षरी व त्यातील मजकुराबाबत कथन करीत आहे. त्यामुळे, सदर दस्त दाखविण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नाही. सबब, आक्षेप नामंजुर).*

**०४.** सदर आदेशावर प्रियांका लगड यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. *(सदर दस्तास* ***पुढील निशाणी क्रमांक ४५*** *देण्यात येते).*

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास – गैरअर्जदारतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांचेकडून –**

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, प्रियांका लगड या आजही आमच्या कार्यालयात कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या सध्या चिपळुन, ता. चिपळुन, जि. रत्नागिरी येथे कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक ४५ कडील आदेश कोणत्या परीस्थीतीमध्ये अस्तीत्वात आला, याविषयी मला

वैयक्तिक ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा आदेश पारीत करण्याच्या प्रक्रियेमध्ये मी स्वतः समाविष्ठ नव्हतो.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत निशाणी क्र. ४५ कडील आदेशाव्यतीरीक्त त्या प्रकरणातील इतर कागदपत्रे प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दंड करण्याच्या प्रक्रियेमध्ये मी अनेक वेळा सहभागी झालेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या व्यक्तीच्या नावे सातबारा उतारा असतो, त्या व्यक्तीच्या नावे विनापरवाना झाडे तोडल्याबाबत दंड आकारला जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या प्रकरणात कोणी विनापरवाना वृक्षतोड केली, याबाबत मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या सातबारा उताऱ्यावर किती व कोणाची नावे नमुद होती, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या जमीनीवरील वृक्षतोड झाल्याचे नमुद आहे, त्या जमीनीचे क्षेत्र किती आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशाप्रकारचे दंड करण्याची प्रक्रिया ही तक्रारी अर्ज प्राप्त झाल्यानंतर किंवा आम्हाला स्वतःला विनापरवाना वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आल्यास चौकशी करुन दंड आकारला जातो. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व्हे क्रमांक, हिस्सा क्रमांकांच्या जमीनीची मोजणी करण्याबाबत आमच्याकडे सोय नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, वृक्षतोड झाली असल्यास वनपाल त्या जागेवर जावुन पंचनामा करतात. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करताना स्थानीक लोक घेतले जातात व ते मोजणी मधील तज्ञ नसतात.

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ४५ कडील आदेशामध्ये विनापरवाना तोडलेल्या झाडांचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ४५ कडील आदेश पाहुन त्यामध्ये कोणत्या झाडाचे किती घनफळ होते, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४५ कडील आदेश कोणत्या परीस्थीत पारीत करण्यात आला, याचे मला व्यक्तीगत ज्ञान नाही. निशाणी क्र. ४५ कडील आदेश हा रामचंद्र लाखण यांच्या तक्रारी अर्जावरुन झाला होता. त्यामध्ये त्यांची ऑनलाईन तक्रार देखील प्राप्त झाली होती.

०८. हे म्हणणे खरे आहे की, परीशिष्टमध्ये समाविष्ठ नसलेल्या (Non-scheduled) झाडांबाबत दंड करण्याचा अधिकार होता की नाही, हे मला प्रस्तुतचा निशाणी क्र. ४५ कडील आदेश पाहुन सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यांना दंड आकारला होता, त्या व्यक्ती त्या जमीनीचे मालक किंवा कब्जेदार होते का, याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आदेशात नमुद असलेल्या व्यक्तिंपैकी नेमकी कोणी व कधी वृक्षतोड केली, हे मला व्यक्तीशः सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ कागदपत्रांवरुन मी वृक्षतोड केल्याचे खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.
**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,
ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.11.10 11:49:39 +0530
**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि.०७/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख,
स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Devrukh. |
| Date | : | 07/11/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 07/11/2025 |
| Evidence uploaded on | : | 10/11/2025 |